# रक्त दान शिबिर व कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम


**वर्ष: २०२१-२२**

गेल्या २५ वर्षापासून सुरू असलेली परंपरा धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सोबत संलग्नित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय येथे दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी भव्य रक्तदान शिबिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या शिबिराला धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे पदाधिकारी यांची उपस्थिति लाभली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अध्यक्ष ॲड. रमेशचंद्रजी चांडक, यांच्या हस्ते पार पडले. त्यांच्या सोबत ॲड. आशिषकुमारजी राठी, श्री रमेशचंद्रजी पसारी, श्री प्रदिपकुमारजी लुणावत, धामणगाव रक्तदान समिती चे अध्यक्ष श्री चेतन कोठारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांची उपस्थिति होती. या संपूर्ण उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक श्री जितेंद्र सुर्यवंशी यांनी आपल्या अनोख्या शैलीत केले व उपस्थितांची मने जिंकली. शिबिराची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पूजन करून झाले. सदर रक्तदान शिबिरासाठी जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय सावंगी मेघे, वर्धा येथून रक्तदान पेढी चे प्रमुख डॉ. सुनील चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची चमू उपस्थित होती. या रक्तदान शिबिराला ८४ रक्तदाते म्हणून लाभले त्यांच्या कडून ७१ यूनिट रक्त पेढी ला मिळाले. रक्तदान पेढी चे प्रमुख डॉ सुनील चावरे यांनी या कोरोना काळात सुद्धा महाविद्यालय व इतर शैक्षणिक संकुल बंद असूनही तरुणाई चा उस्फुर्त सहभाग बघून आश्चर्य व्यक्त केले. या शिबिराच्या सुरुवातीला धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखरजी चांडक यांनी आपले मनोगत व्यक्त केले व राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालय धामणगाव यांच्या कडून युवक दिना निमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट रित्या केलेल्या आयोजनाची स्तुति केली व सोसायटी तर्फे सर्वांचे अभिनंदन केले. २५ वर्षापासून सतत चालू असलेली ही रक्तदान शिबिर आयोजनाची परंपरा अजूनही चालू आहे याचे आश्चर्य व्यक्त करून पुढील भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर संपूर्ण रक्तदाते व सावंगी मेघे वर्धा येथून आलेल्या रक्त पेढी चे धामणगाव एज्युकेशन सोसायटी च्या वतीने धन्यवाद मानले .

रक्तदानाची सुरुवात महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग येथे कार्यरत, माजी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपले रक्तदान करून केली व शेवट हा याच महाविद्यालयाचे सहयोगी

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक शृंगारे सरांनी केला. सोबतच महाविद्यालयाच्या इतर शिक्षक, रा.से.यो., रा. छा. से., महाविद्यालयीन आजी व माजी विद्यार्थी, धामणगाव वासी, पत्रकार बंधु व इतर गावकरी मंडळी यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले. हे संपूर्ण रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर व संपूर्ण राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना चे स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.














Dhamangaon Education Society's

Adarsha Science, J.B. Arts & Birla Commerce Mahavidyalaya
Dhamangaon Rly., Dist. Amravati, Maharashtra, India-444709

Principal
Dr. Yogendra B. Gandole

No. Date:

To,
In-Charge, Blood Bank
Jawaharlal Nehru Medical College,
Sawangi Meghe, Wardha

**Subject: Request for Blood Donation camp on 12th January 2022**

Sir,

The importance of Blood Donation can never be over-emphasized. Donating blood instills a sense of sacrifice in human being that is the hall mark of compassion, love and humanity. It is only the blood of human being that can save life of another when no other way of help can be of use. Hence it is mandated that blood banks at all time should have at their disposals a sufficient stock of blood. In today's world of healthcare, it will be a blot on humanity when a single person dies as want of blood. Thankfully in India many social organizations have been tirelessly working for the noble cause of blood donation.

As an institution that has always prided itself for being committed to humanitarian and philanthropic causes and to include the importance of this mission in future citizens of India, Adarsha Mahavidyalaya been organizing annual donation camp since 1996. The camp is organized on 12th of January each year as a mark of reverence to the great visionary Swami Vivekananda whose birth anniversary is celebrated on this day as a Yuvak Din. This year too, the college is keeping its glorious tradition alive by organizing blood donation camp on 12th of January 2022 from 10.00 AM onwards till 01.30 PM.

You are requested to be so kind to depute your Blood Collection Team with necessary equipment and materials and inform us accordingly about your consent. The blood donation team is expected to reach the college by 09.30 am so that blood donation camp can be started from 10.00 am.

We shall be grateful to you for your kind corporation.

Thanking you. !

Yours Faithfully

Dr. Y. B. Gandole
Principal

Address: Anjansingi Road, Dhamangaon Railway, District Amravati, Maharashtra, India 444709

# राष्ट्रीय सेवा योजना

## रक्तदान करा !
## रक्तदान सर्वश्रेष्ठ दान।।

वर्ष २५ वे

मेरी आशा, मेरा विश्वास नवीन पिढी के नवयुकों पर है। उन्ही में से मैं अपने कार्यकर्ताओं का संग्रह करुंगा। वे सिंहविक्रम से देश की यथार्थ उन्नती सम्बन्धी सारी समस्या का समाधान करेंगे। वर्तमान में अनुष्ठेय आदर्श को मैंने अपना जीवन समर्पित कर दिया है।
- स्वामी विवेकानंद

भारत मातेचा एका महान सुपुत्र - स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस दि. १२ जानेवारी, रक्तदान करुन त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करण्याची ही सुवर्ण संधी दवडू नका. "युवकांनो जागे व्हा....." ह्या स्वामीजींच्या हाकेला प्रतिसाद म्हणून, रक्तदानाच्या राष्ट्रिय कार्यात सहभागी व्हा. आपण केलेल्या रक्तदानामुळे कुणा एका देशबांधवास जीवनदान मिळू शकेल हे विसरु नका. आपणा सर्वांच्या सहकार्याने आम्ही सलग २५ व्या वर्षी आयोजित करीत आहोत. देशात कोविड-१९ महामारीच्या काळात रक्ताचा तुटवडा आहे म्हणून रक्तदान करुन सहकार्य करावे.

# भव्य रक्तदान शिबीर

दिनांक १२ जानेवारी २०२२ वेळ : सकाळी १०.३० ते १.३०
स्थळ : आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

कृपया रक्तदानाला येतांना मास्क वापरावे व सोशल डिस्टर्सींग चे पालन करुन जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

❁ विनीत ❁

**आदर्श महाविद्यालय परिवार**

# रक्त दान शिबिर (वर्ष २६ वे)

## वर्ष: २०२२-२३

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज .भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय येथे नुकतेच १२ जानेवारी २०२३ ला स्वामी विवेकानंद यांची १६० वी जयंती, राजमाता जिजाऊ यांची ४२५ वी जयंती व धामणगाव एज्यूकेशन सोसायटीचे भूतपूर्व अध्यक्ष श्री श्री लक्ष्मीनारायणजी अग्रवाल जन्म शताब्दी पर्व या निमित्ताने आदर्श महाविद्यालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कर्मयोगी स्व. श्री लक्ष्मीनारायणजी यांचा जन्म ७ जानेवारी १९२३ ला झाला असून, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. दूरदृष्टी व सृजनशीलता, शिक्षणाविषयीची आस्था या त्यांच्या गुणांमुळे आजही ते सर्वांचे प्रेरणा स्थान व वंदनीय आहेत. स्व. श्री लक्ष्मीनारायणजी अग्रवाल यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात शिक्षण संस्थेने फार मोठी भरभराट केली. विविध शाखा व विद्यालये असे एकूण संस्थेचे चौदा आयाम त्यांच्या कार्यकाळामध्ये सुरू होते. त्यामुळे त्यांचा अध्यक्षीय कार्यकाळ हा संस्थेच्या यशाकरिता मैलाचा दगड ठरला. त्यांच्या या सत्कार्याला अभिवादन म्हणून या वर्षीचं हे २६ वे रक्त दान शिबिर कर्मयोगी स्व. श्री लक्ष्मीनारायणजी अग्रवाल यांना समर्पित करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष ॲड. श्री रमेशचंद्रजी चांडक, सचिव ॲड. श्री आशिषजी राठी, धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे कार्यकारिणी सदस्य श्री प्रदिपकुमारजी लुणावत, रक्तदान समिती धामणगाव रेल्वे चे अध्यक्ष श्री चेतन कोठारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे व जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज, सावंगी मेघे वर्धा येथील संपूर्ण वैद्यकीय चमू चे प्रभारी डॉ. सुनील चवरे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी दीप प्रज्वलन व प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्या नंतर रा. से. यो. चमू ने विद्यापीठ गीत व स्वागत गीत सादर करून उपस्थितांना मंत्र मुग्ध केले. त्या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. श्री रमेशचंद्रजी चांडक यांच्या शुभेच्छा व परवानगी ने रक्तदान शिबिराची प्रत्यक्ष सुरुवात झाली. रक्तदान शिबिराचे विशेष म्हणजे प्रथम रक्तदाता म्हणून आदर्श महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. नरेंद्र नागपुरे तसेच द्वितीय रक्तदाता म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे सचिव ॲड. श्री आशिषकुमारजी राठी यांना बहुमान मिळाला. त्यांच्या या साहसी कृतीतून इतर युवकांचे उत्साह वर्धन झाले. या रक्तदान शिबिरा दरम्यान एकूण १०८ रक्त दात्यांनी उपस्थिति दर्शविली व डॉक्टरांच्या संमतीने १०० यूनिट चे प्रत्यक्ष रक्तदान झाले. अनेक वर्ष नंतर अशा प्रकारचे रक्तदान शिबिराचे आयोजन व उत्साह आम्हाला अनुभवास मिळाला. या शिबिराच्या माध्यमातून कमीत कमी ४०० गरजू रुग्णांचे प्राण वाचवता येईल असे मत डॉ सुनील चवरे यांनी व्यक्त केले. जन्मशताब्दीनिमित्त या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे शताब्दी १०० वर्ष आणि १०० रक्तदाते लाभले त्या करिता रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक यांनी एकाच वेळी रक्तदान करून हा आकडा गाठण्याकरिता सहकार्य केले व रा.से.यो. ची माजी स्वयंसेविका पायल गुप्ता हीला १०० वी रक्तदाता म्हणून बहुमान मिळाला. या कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्र संचलन व आभार प्रदर्शन रा.से.यो. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांनी आपल्या विशिष्ट शैलीत पार पाडले व उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील, डॉ प्रवीण केचे, सहा. कार्यक्रम अधिकारी, रा. से. यो. वरिष्ठ स्वयंसेवक प्रा. विशाल मोकाशे व आदर्श बरवट यांनी केले. या रक्तदान शिबिराच्या

यशस्विते करिता महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी  तसेच धामणगाव परिसरातील इतर मान्यवर व रक्तदाते यांनी रक्तदान करून सहकार्य केले व रा. से. यो स्वयंसेवकांनी आपल्या अथक परिश्रमाने, उत्साहाने हे शिबिर यशस्वी करून स्व. श्री लक्ष्मीनारायणजी अग्रवाल यांना आदरांजली अर्पण केली.





1. धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना
2. धामणगाव एज्युकेशन सोसायटी सचिव रक्तदान करताना









रक्त दात्यांची नोंदणी




२६ वे रक्तदान शिबिरा मध्ये परिश्रम घेतलेले रा से यो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी